महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : ९७ वे | दिनांक : ३१/०३/२०२६ | वार : मंगळवार

## महाराष्ट्र माओवादमुक्त करण्यात पोलिसांना मोठे यश! : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



**मुंबई :** महाराष्ट्रातील पोलिस दलाला तंत्रज्ञानाने अधिक सक्षम करण्यासाठी राज्य सरकारने कंबर कसली आहे. गुन्हेगारी तपासात पारदर्शकता आणि वेग आणण्यासाठी आता कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आणि 'ब्लॉकचेन' तंत्रज्ञानाचा वापर केला जाणार असून, पुढील सहा महिन्यांत एफआयआरपासून ते चार्जशीटपर्यंतची सर्व प्रक्रिया पूर्णपणे 'डिजिटाइज' करण्याचे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. तसेच, गडचिरोलीत माओवादाचा बीमोड करणाऱ्या सी-६० दलातील जवानांसाठी त्यांनी विशेष पदक जाहीर केले आहे.

वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांसोबत झालेल्या बैठकीनंतर माध्यमांशी बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, "केंद्र सरकारने राज्यांच्या तांत्रिक प्रगतीसाठी १०६ मुद्दे दिले होते, ज्यांचे पालन करण्यात महाराष्ट्र अग्रस्थानी आहे. आता आपण पुराव्यांच्या व्यवस्थापनासाठी 'ब्लॉकचेन' तंत्रज्ञानाचा वापर करणार आहोत, ज्यामुळे पुराव्यांमध्ये छेडछाड करणे अशक्य होईल. ही यंत्रणा सर्व पोलिस ठाण्यांमध्ये सहा महिन्यांत कार्यान्वित करण्याच्या सूचना पोलिस महासंचालकांना दिल्या आहेत."

माओवादमुक्ती आणि सी-६० जवानांचा गौरव

"महाराष्ट्रात माओवाद आता जवळपास संपुष्टात आला आहे. ही लढाई लढताना आमच्या २४४ पोलिसांनी बलिदान दिले. त्यांच्या बलिदानाची दखल घेत आणि हे कठीण काम करणाऱ्या पोलिसांचे मनोबल वाढवण्यासाठी, ज्यांनी सी-६० फोर्समध्ये किमान ३ वर्षे सेवा बजावली आहे, त्या सर्वांना 'सी-६० मेडल' देऊन सन्मानित करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे," असे मुख्यमंत्र्यांनी अभिमानाने नमूद केले.

अपराधसिद्धीचा दर ९५ टक्क्यांवर नेण्याचे लक्ष्य

राज्यातील गुन्हेगारांना शिक्षा होण्याचे प्रमाण (Conviction Rate) वाढवण्यासाठी सरकार आग्रही आहे. सद्यस्थितीत हा दर ५० टक्क्यांच्या आसपास असून तो ९५ टक्क्यांपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. यासाठी गेल्या ४ ते ५ वर्षांतील प्रकरणांचे 'एआय'च्या माध्यमातून विश्लेषण करण्याचे काम सीआयडीला (CID) सोपवण्यात आले आहे. विशेषतः सेशन्स कोर्टातील निकालांमध्ये सुधारणा करण्यासाठी विशेष रणनीती आखली जात आहे.

अंमली पदार्थांविरोधात 'ड्रग्ज फ्री कॅम्पस' मोहीम


राज्यातील तरुण पिढीला व्यसनाधीनतेपासून वाचवण्यासाठी 'ड्रग्ज फ्री कॅम्पस' ही संकल्पना राबवण्यात येणार आहे. अंमली पदार्थांच्या तस्करीविरुद्ध आणि विक्रीविरुद्ध महाराष्ट्रात लवकरच एक मोठी लढाई पुकारली जाईल. यासाठी पोलिस महासंचालक लवकरच एक सविस्तर रणनीती आणि सादरीकरण मुख्यमंत्र्यांसमोर ठेवणार आहेत.

अपघात रोखण्यासाठी 'नागपूर मॉडेल'चा विस्तार

रस्ते अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी पोलिसांनी केलेल्या प्रयत्नांचे मुख्यमंत्र्यांनी कौतुक केले. नागपूरमध्ये प्रायोगिक तत्त्वावर राबवण्यात आलेल्या एका मॉडेलमुळे तेथील अपघातांत ३० टक्क्यांनी घट झाली आहे. हेच मॉडेल आणि मुंबई-पुणे एक्सप्रेसवेवरील यशस्वी प्रयोगांच्या धर्तीवर संपूर्ण राज्यात अपघात रोखण्यासाठी विशेष उपाययोजना केल्या जाणार आहेत.

## विजय शिवतारे यांना कन्या डॉ. ममता यांनी दिली किडनी; मुंबईत पार पडली यशस्वी शस्त्रक्रिया





**मुंबई :** मुलगी आणि वडिलांचे नाते हे जगातील सर्वात हळवे नाते असते, याची प्रचिती देणारी एक हृदयस्पर्शी घटना समोर आली आहे. पुरंदरचे आमदार आणि शिवसेनेचे ज्येष्ठ नेते विजय शिवतारे यांना त्यांची कन्या डॉ. ममता शिवतारे यांनी स्वतःची किडनी दान करून नवजीवन दिले आहे. मुंबईतील एका नामांकित रुग्णालयात ही प्रत्यारोपण शस्त्रक्रिया आज यशस्वीरित्या पार पडली असून, सध्या पिता-कन्या दोघांचीही प्रकृती स्थिर असल्याची माहिती रुग्णालय प्रशासनाने दिली आहे.

यासंबंधीच्या वृत्तानुसार, गेल्या काही काळापासून आमदार विजय शिवतारे हे किडनीच्या विकाराने त्रस्त होते. त्यांचे दोन्ही मूत्रपिंड निकामी झाल्यामुळे त्यांना नियमित डायलिसिसवर राहावे लागत होते आणि त्यांची प्रकृती दिवसेंदिवस खालावत चालली होती. अशा कठीण प्रसंगी त्यांची कन्या डॉ. ममता शिवतारे या वडिलांच्या आयुष्यात 'देवदूत' बनून पुढे आल्या. केवळ एक कर्तव्यदक्ष मुलगीच नव्हे, तर एक डॉक्टर म्हणूनही त्यांनी वडिलांना या संकटातून बाहेर काढण्याचा निर्णय घेतला आणि स्वतःची किडनी दान करण्याचा निर्णय घेतला.

वडिलांच्या जीवनासाठी स्वतःची किडनी देण्याच्या ममता यांच्या या निर्णयाने अवघा महाराष्ट्र भारावून गेला आहे. "आईपेक्षा लेकीचा बापावर जास्त जीव असतो," हे वाक्य ममता यांनी कृतीतून सिद्ध केले आहे. पुरंदर तालुक्यासह संपूर्ण राज राजकीय वर्तुळात या बाप-लेकीच्या नात्याची आणि डॉ. ममता यांच्या त्यागाची मोठी चर्चा होत आहे. एका लेकीने वडिलांना दिलेली ही जीवनाची भेट अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

## अशोक खरातला कधीही भेटले नाही, सर्व आरोप कपोलकल्पित : तृप्ती देसाईंच्या गौप्यस्फोटावर नीलम गोऱ्हे यांचे स्पष्टीकरण



**पुणे :** नाशिकमधील भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणामुळे राज्यभरात खळबळ उडालेली असतानाच आता या प्रकरणाला नवं राजकीय वळण मिळालं आहे. सामाजिक कार्यकर्त्या तृप्ती देसाई यांनी विधानपरिषद सदस्य नीलम गोऱ्हे यांच्यावर गंभीर आरोप करत मोठा गौप्यस्फोट केला आहे. गोऱ्हे या गेल्या काही वर्षांपासून अशोक खरातच्या संपर्कात होत्या आणि राजकीय फायद्यासाठी त्याला भेटत असल्याचा दावा देसाईंनी केला आहे. या आरोपांवर नीलम गोऱ्हे यांनी पत्रकार परिषद घेत आपली स्पष्ट भूमिका मांडली असून सर्व आरोप फेटाळून लावले आहेत.

नीलम गोऱ्हे म्हणाल्या, मी जे कोणते काम करते ते समोर करते, कुठलीही गोष्ट लपवलेली नाही. माझ्या कामाची पद्धत आणि माझी तत्त्व मी कधी कोणापासून लपवलेले नाही. माझे पंढरपूर येथील आजोबा दिवंगत वकील श्रीपाद देशपांडे, माझी आई लतिकाताई गोऱ्हे आणि माझे वडील शास्त्रज्ञ डॉ. दिवाकर गोऱ्हे यांनी माझ्यावर जे आधुनिक संस्कार बिंबवले मी त्याचे पालन करत आले आहे. गेल्या 5 दशकात कोणत्याही ढोंगी गुरूचा अवतार म्हणवणाऱ्या बुवांना भेटायचे नाही, त्यांच्या दर्शनाला जायचे नाही, हा संस्कार अजूनही पाळते. महिलांची प्रगती व सामाजिक न्याय यावर काम करत मी राजकारणात आले. मी प्रबोधनकारी हिंदुत्व मानते. राजकीय पदे किंवा मंत्रिपद मिळवण्यासाठी कधीही कोणत्याही तंत्रीक गुरुची मला गरज भासलेली नाही.

भेटीच्या बातम्या पूर्णतः कपोलकल्पित

पुढे बोलताना नीलम गोऱ्हे म्हणाल्या, नाशिक येथील एक्सप्रेस इन हॉटेलमध्ये मी खरात नावाच्या व्यक्तीला 6-7 वर्षांपूर्वी किंवा अन्य कोणत्याही कारणासाठी भेटले या वृत्ताचा मी स्पष्टपणे नाकारते. अशा पद्धतीच्या भेटीच्या बातम्या पूर्णतः कपोलकल्पित म्हणजेच काल्पनिक आहेत. माझी सामाजिक व राजकीय कृतीशीलता, विधानसभेत असलेले उपसभापती पद, त्याला असलेला मंत्री दर्जा यामुळे काही मोजक्या व्यक्तींमध्ये द्वेष निर्माण झालेला आहे. या आत्ता झालेल्या आर्थिक अधिवेशनातील माझे संसदीय कार्य, सातारा एसपी निलंबनाची अंमलबजावणी आणि निरोपाच्या वेळेला माननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, माननीय उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे आणि माननीय उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी माझी जी प्रशंसा केली ती काही हितशत्रूंना सहन झालेले नाही. विशेषतः पुणे महापालिकेत ज्यांना यश मिळाले नाही असे काही घटक माझ्याविरोधात षड्यंत्र रचत आहेत.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ३१ मार्च २०२६


## अजय घारगेचा अमरावती येथे पोलीस मध्ये भरती झाल्या बदल सत्कार



**मुरूम (प्रा.सुधीर पंचगल्ले) :** दि .३० मार्च २०२६ रोजी श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय उमरगा येथील एनसीसी विभागातील कॅडेट अजय परमेश्वर घारगे राहणार कोंडजीगड ता लोहारा येथील रहिवासी हा भाग भूकंपग्रस्त परिसरात असल्यामुळे अनेक कठिण समस्याला सामोरे जाऊन वडिलांने कुटुंब सांभाळले . उदरनिर्वाह हा केवळ शेतीच असल्यामुळे वडिलांनी अजयला शिक्षणासाठी श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय उमरगा येथे बीए प्रथम वर्षात तसेच एनसीसी मध्ये प्रवेश घेण्यास सांगितला घरची हालाकिची परिस्थिती असल्यामुळे मुलाला पोलीस करण्याचे स्वप्न मनात होते ते वडिलाचे स्वप्न अजयनी पूर्ण करून दाखवले . या यशिस्वेतेबद्दल महाविद्यालयाच्या वतीने प्राचार्य डॉ संजय अस्वले यांनी त्याचा सत्कार करून पुढील प्रशिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या .

या सत्कारप्रसंगी प्राचार्यांनी मार्गदर्शन करताना इतर कॅडेटसनी पण यशस्वी होण्यासाठी स्पर्धा परीक्षेची तयारी करावे असे आव्हान केले.या सत्कार समयी डॉ पद्माकर पिटले कॅप्टन डॉ ज्ञानेश्वर चिट्टमपल्ले ,डॉ सुभाष इंगळे डॉ सन्मुख मुच्छटे, डॉ खंडु मुरळीकर, राजकुमार सोनवणे, नितीन कोराळे प्राध्यापक, कॅडेट्स उपस्थित होते .पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

## डॉ. सौ. इं. भा. पा. महिला महाविद्यालयात तृतीय वर्षाच्या विद्यार्थिनींसाठी शुभेच्छा समारंभ उत्साहात संपन्न



**छत्रपती संभाजीनगर :** : डॉ. सौ. इं. भा. पा. महिला महाविद्यालयात तृतीय वर्षाच्या विद्यार्थिनींसाठी आयोजित शुभेच्छा समारंभ उत्साहपूर्ण व भावनिक वातावरणात पार पडला. अंतिम वर्षातील विद्यार्थिनींना निरोप देत त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देणे हा कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. सुनिता बाजपाई उपस्थित होत्या. यावेळी विद्यार्थी संसद प्रमुख डॉ. सुनंदा चक्रनारायण, डॉ. प्रेमला मुखेडकर तसेच बीसीए विभागप्रमुख प्रा. अंजली उमाळकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली.कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. सुनंदा चक्रनारायण यांनी केले. त्यांनी आपल्या भाषणात तृतीय वर्षाच्या विद्यार्थिनींच्या तीन वर्षांच्या शैक्षणिक प्रवासाचा आढावा घेत त्यांच्या मेहनतीचे व यशाचे कौतुक केले. विद्यार्थिनींनी पुढील आयुष्यातही प्रामाणिकपणे प्रयत्न करून महाविद्यालयाचे नाव उज्ज्वल करावे, असे त्यांनी सांगितले.यावेळी बी.ए., बी.कॉम आणि बीसीए शाखेतील कु. श्रुती भवार, कु. अनुजा काळे, कु. श्रेया भोळे आदी विद्यार्थिनींनी मनोगत व्यक्त करताना महाविद्यालयातील आठवणींना उजाळा दिला. शिक्षकांचे मार्गदर्शन, मैत्रिणींसोबत घालवलेले क्षण आणि विविध उपक्रमांमधील सहभागामुळे व्यक्तिमत्त्व घडल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. महाविद्यालय सोडताना येणारी हुरहूर आणि कृतज्ञता त्यांच्या शब्दांतून प्रकर्षाने जाणवली.यानंतर डॉ. प्रेमला मुखेडकर व प्रा. अंजली उमाळकर यांनी विद्यार्थिनींना आगामी परीक्षांसाठी शुभेच्छा देत आत्मविश्वास, चिकाटी आणि सकारात्मक दृष्टिकोन ठेवण्याचा सल्ला दिला. जीवनातील आव्हानांना धैर्याने सामोरे जाण्याचे त्यांनी आवाहन केले.अध्यक्षीय समारोप करताना प्रभारी प्राचार्या डॉ. सुनिता बाजपाई यांनी "शिक्षण हे केवळ पदवी मिळवण्यापुरते मर्यादित नसून व्यक्तिमत्त्व विकासासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे," असे सांगून प्रामाणिकपणा, शिस्त आणि मेहनतीच्या बळावर यश संपादन करण्याचा संदेश दिला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अश्विनी शहाणे यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. तेजा दीक्षित यांनी केले. कार्यक्रमास शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण कार्यक्रम आनंददायी, भावनिक व प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाला

## स्वप्नाच्या वाटेवर

काही मिळवण्यासाठी
गमवावं लागतं
गाठीला असलेलं खूप काही
हे माहीत असूनही
आकाशाला गवसणी घालण्याचं
स्वप्न उरात घेऊन
सोडलंय मी जन्मभूमी गाव..

तेव्हा झाली होती..नेमकीच
आयुष्याची दुपार
अन् तापलं होतं रान
सूर्य डोईवर आल्याने..

खूप दिवस झाले आता
देह अन् आत्म्यासोबत
स्वप्नाना करपून
या काटेरी उन्हाच्या दिसात..

स्वप्नाच्या वाटेवर चालतांना
सगळंच बदललं
सावलीच्या झाडांनी
सोडलीय साथ
अन् राहिली नाही आता
कोणत्याच स्वप्नपूर्तीची आस..

आता पदराला पराभव बांधून
फिरतोय अश्वत्थाम्यासारखा
वणवण करीत..
या कलियुगातल्या मायावी जाळात..

**ज्ञानेश्वर गायके, कन्नड**

## शेतकरी केवळ 'उत्पादक' नव्हे तर यशस्वी 'उद्योजक' व्हावा - पणन मंत्री जयकुमार रावलवाढवणजवळ उभारणार जगातील सर्वोत्तम बाजार व्यवस्था

**मुंबई :** बदलत्या परिस्थितीत शेतकरी हा केवळ उत्पादक राहून चालणार नाही, तर तो उत्तम उद्योजक बनला पाहिजे. यासाठी पणन विभागाच्या वतीने आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येत आहेत. याचबरोबर शेतीमालाच्या उत्पादनासोबतच त्याचे मार्केटिंग, ब्रँडिंग, पॅकेजिंग आणि विक्री या सर्व बाबींमध्ये शेतकऱ्यांनी सहभाग घेतला पाहिजे, असे प्रतिपादन पणन मंत्री जयकुमार रावल यांनी केले. या प्रक्रियेत शेतकऱ्यांच्या हितासाठी शेतकरी उत्पादक संस्थांच्या माध्यमातून चळवळ उभी राहील, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ आणि महाराष्ट्र ॲग्री बिझनेस नेटवर्क (मॅग्नेट) यांच्या संयुक्त विद्यमाने यशवंतराव चव्हाण केंद्र येथे आयोजित शेतकरी उत्पादक संस्थांच्या (एफपीओ) राज्यस्तरीय परिषदेचे उद्घाटन पणन मंत्री जयकुमार रावल यांच्या हस्ते झाले. यावेळी बोलताना पणन मंत्री रावल म्हणाले, राज्यात सध्या अस्तित्वात असलेल्या बाजार व्यवस्थेपेक्षा अधिक आधुनिक, सुसज्ज आणि जागतिक दर्जाची बाजार साखळी उभारण्याची गरज आहे. यासाठी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांच्या मार्गदर्शनात वाढवण पोर्ट परिसरात सुमारे १२०० एकरवर अत्याधुनिक आंतरराष्ट्रीय दर्जाची बाजार समिती उभारण्याचे नियोजन करण्यात येत आहे. ही बाजारपेठ रस्ता, रेल्वे, बंदर आणि विमानतळाशी जोडलेली असेल, ज्यामुळे राज्यातीलच नव्हे तर देशभरातील शेतीमालासाठी महाराष्ट्र जागतिक व्यापार केंद्र म्हणून उदयास येईल.एफपीओच्या माध्यमातून चळवळीतून शेतकऱ्यांना नवे बळराज्यात शेतकरी उत्पादक संस्था (एफपीओ) आणि शेतकरी उत्पादक कंपनी (एफपीसी) या केवळ योजना नसून शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणाची मोठी चळवळ असल्याचे मंत्री जयकुमार रावल यांनी नमूद केले. लहान व सीमांत शेतकऱ्यांना एकत्र आणून त्यांना बाजारपेठेत सक्षमपणे उभे करण्यासाठी या संस्थांची भूमिका महत्त्वाची असल्याचे त्यांनी सांगितले. एफपीओच्या माध्यमातून उत्पादन ते विक्रीपर्यंत संपूर्ण मूल्य साखळी उभारता येते.

यामध्ये लॉजिस्टिक्स, वेअरहाउसिंग, प्रक्रिया, पॅकेजिंग आणि मार्केटिंग या सर्व सेवा एकाच छताखाली उपलब्ध करून देता येतील, असेही त्यांनी स्पष्ट केले.प्रक्रिया उद्योग आणि मूल्यवर्धनावर भरशेतमालावर प्रक्रिया करून त्याचे मूल्य वाढवणे अत्यंत गरजेचे असल्याचे मंत्री रावल यांनी सांगितले. सोलर ड्रायिंग, पॅकेजिंग, ब्रँडिंग यांसारख्या माध्यमातून शेतमाल अधिक काळ टिकवून त्याला चांगला बाजारभाव मिळवता येतो. राज्यात दरवर्षी सुमारे १० हजार कोटी रुपयांचा शेतमाल पोस्ट-हार्वेस्टमध्ये वाया जात असल्याचे त्यांनी सांगितले.

हे नुकसान टाळण्यासाठी प्रक्रिया उद्योग आणि साठवण सुविधा उभारणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.डिजिटल मार्केटिंग आणि ई-नामचा वापर वाढवणारशेतकऱ्यांनी पारंपरिक बाजारपेठेपुरते मर्यादित न राहता डिजिटल प्लॅटफॉर्मचा वापर करावा, असे आवाहन मंत्री रावल यांनी केले. ई-नामसारख्या प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून राज्य, देश आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर बाजारपेठ उपलब्ध होऊ शकते, असे त्यांनी सांगितले. आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्षाच्या पार्श्वभूमीवर महिला शेतकऱ्यांना एफपीओच्या माध्यमातून सक्षम करण्याचा प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले. महिलांनी संघटित होऊन शेती व व्यवसायात पुढे यावे, असे आवाहन त्यांनी केले.दीर्घकालीन उपायांवर सरकारचा भरमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांना बिकट परिस्थितीत मदतीचा हात देण्यासाठी कर्जमाफी करण्याचा निर्णय घेतला आहे. तथापि हा तात्पुरता उपाय आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना स्वावलंबी बनवणाऱ्या दीर्घकालीन उपाययोजनांवर सरकार भर देत असल्याचे मंत्री जयकुमार रावल यांनी स्पष्ट केले.

उत्पादनासोबतच विक्री व्यवस्थेची साखळी मजबूत केल्यासच शेती क्षेत्रात खऱ्या अर्थाने परिवर्तन होईल, असे त्यांनी सांगितले.शेतकरी उत्पादक संस्थांची परिषद ही शेतकऱ्यांच्या हितासाठी उभी राहणारी चळवळ आहे, असे सांगत मंत्री जयकुमार रावल यांनी सर्व एफपीओ प्रतिनिधींना एकत्रितपणे काम करण्याचे आवाहन केले. तसेच त्यांनी परिषदेला शुभेच्छा दिल्या.याप्रसंगी कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम, सरव्यवस्थापक विनायक कोकरे, मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव शरद जरे, राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्थेचे संचालक मिलिंद आकरे, एडीबीचे अतिरिक्त संचालक डॉ. अमोल यादव यांच्यासह शेतकरी उत्पादक संस्थांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ३१ मार्च २०२६

## "अंगत पंगत"ला राज्यस्तरीय बालसाहित्य पुरस्कार



**छत्रपती संभाजीनगर :- (प्रतिनिधी)** कोल्हापूर जिल्ह्यातील " अक्षर सागर साहित्य मंच " गारगोटी ता. भुदरगड येथील 2025 चा राज्यस्तरीय बाल साहित्य पुरस्कार यंदा मराठवाडयाचे प्रसिद्ध बालकवी अय्युब पठाण लोहगावकर यांचा मुलांच्या भावविश्वाला आनंद देणारा रंगीत चित्र असलेला बाल कवितासंग्रह " अंगत पंगत" या पुस्तकाला जाहीर झाला आहे.

अक्षर सागर साहित्य मंचाचे अध्यक्ष डॉ. मा. ग. गुरव यांनी अय्युब पठाण यांना नुकतेच कळविले आहे. पुरस्कार वितरण सोहळा मान्यवरांच्या हस्ते दिनांक 25 एप्रील 20 26 रोजी गारगोटी येथील शाहू वाचनालयात होणार आहे. या पुरस्काराचे स्वरूप रोख रक्कम, स्मृतिचिन्ह, व सन्मानपत्र असे आहे. अय्युब पठाण यांना बालसाहित्य पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल प्रसिद्ध साहित्यिक तथा प्रा. बा. स. जठार,प्रसिध्द बालकवी रविंद्र चालीकवार, कवी मनोज खुटे, शिक्षक भास्कर गोपाल यांनी पठाण यांचे अभिनंदन केले आहे.

## एप्रिल २०२६ मध्ये 'विशेष डिजिटल शेती शाळा : राज्यातील सर्व शेतकऱ्यांना सहभागी होण्याचे आवाहन

**बीड (भगवंत पाळवदे) :** हवामानातील वाढती अनिश्चितता, पावसाचा खंड आणि नैसर्गिक आपत्तींमुळे पारंपारिक कोरडवाहू शेती संकटात सापडली असून उत्पादन खर्च वाढत आहे. यावर मात करण्यासाठी कृषी विभागांतर्गत नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पामार्फत महाराष्ट्र राज्याकरिता "हवामान अनुकूल तंत्रज्ञान अभियान" सुरू केले आहे. हे अभियान शेतीचा उत्पादन खर्च कमी करणे आणि प्रतिकूल परिस्थितीतही शेतकऱ्यांच्या उत्पन्नाची हमी देणे या उद्देशाने राबविण्यात येत आहे. हे अभियान यशस्वी करण्यासाठी कृषी विभागाबरोबरच, कृषी विद्यापीठे, कृषी विज्ञान केंद्रे, उमेद, माविम, पशुसंवर्धन विभाग इ. यंत्रणादेखील सहभागी होत आहेत. या अभियानाचा एक टप्पा म्हणजे हवामान अनुकूल तंत्रज्ञानावर आधारित विशेष डिजिटल शेतीशाळांचे आयोजन. नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प आणि पानी फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने एप्रिल 2026 महिन्यात चार विशेष डिजिटल शेती शाळा' आयोजित करण्यात येत आहेत. राज्यातील सर्व प्रकारच्या पिक पद्धतींना उपयुक्त असणाऱ्या तंत्रांची माहिती एकाच व्यासपीठावर उपलब्ध करून देण्यासाठी कृषी विद्यापीठे आणि कृषी विभागातील तज्ञ आणि प्रगतशील शेतकरी यांचेमार्फत या डिजिटल शेतीशाळामध्ये ज्ञानाचे आदान प्रदान होणार आहे.

विशेष डिजिटल शेतीशाळांचे वेळापत्रक व विषय असे आहेत.

- शेतीशाळा 1 (1 एप्रिल 2026) : पेरणीपूर्व तंत्रज्ञान - बेड तयार करणे व बेडवर टोकण करणे, शून्य/कमीत कमी मशागत करणे , आंतरपीक पद्धत, बियाणे उगवण क्षमता तपासणी आणि बीजप्रक्रिया.
- शेतीशाळा 2 (8 एप्रिल 2026): जैविक व नैसर्गिक निविष्ठा उत्पादन- बीजामृत, जीवामृत, लिंबोळी अर्क, दशपर्णी अर्क, ट्रायकोडर्मा तयार करण्याच्या पद्धती व फायदे
- शेतीशाळा 3 (15 एप्रिल 2026): एकात्मिक कीड व्यवस्थापन- सापळा पिके, पक्षी थांबे, चिकट सापळे, मित्र किटकांचे संवर्धन, लिंबोळी आणि दशपर्णी अर्काचा वापर
- शेतीशाळा 4 (22 एप्रिल 2026) : भात शेतीसाठी सुधारित लागवड तंत्र- भाताची थेट पेरणी (DSR), श्री पद्धत आणि भात लावणीसाठी यांत्रिकी पद्धत

सर्व शेतीशाळा वर नमूद तारखांना सायंकाळी 7.30 वाजता सुरु होणार असून या शेती शाळांचे लाइव्ह (LIVE) प्रसारण कृषी विभाग, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प, पानी फाउंडेशन आणि उमेद च्या YouTube चॅनेलवर केले जाणार आहे.

शेतकरी, महिला गट, शेतकरी उत्पादक कंपन्यांचे सदस्य, कृषी मंडळे, बिजोत्पादक, फार्मर कप स्पर्धेत भाग घेऊ इच्छिणारे निमंत्रक व शेतकरी गट, वनपट्टे धारक या सर्वांनी मोठ्या संख्येने डिजिटल शेती शाळांना जॉईन व्हावे असे आवाहन कृषी विभाग आणि नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पामार्फत करण्यात येत आहे.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती अध्यक्षपदी गुणीरत्न वाकोडे



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** येथील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर उत्सव समितीच्या अध्यक्ष पदी सर्वानुमते गुणीरत्न वाकोडे यांची निवड करण्यात आली आहे. सदरील बैठकीस समाज बांधव मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.या विषयी सविस्तर माहिती अशी की जिंतूर नगरपरिषदेच्या प्रांगणातील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याजवळ मोहन घनसावध यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या बैठकीत सर्वानुमते यावर्षी संपन्न होणाऱ्या भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी गुणीरत्न वाकोडे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. तसेच उपा उपाध्यक्ष म्हणून कर्मवीर घनसावत प्रकाश वाव्हळे, तर सचिव म्हणून बलवान वाकळे सर कोषाध्यक्ष लखन निकाळजे, सहसचिव प्रकाश नवसागर, कार्याध्यक्षपदी गणेश काकडे, विकास अण्णा मोरे तर सहकोशाअध्यक्ष स्वप्निल रायबोले यांची निवड सर्वांना मते करण्यात आली आहे.

135 व्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सवानिमित्त दरवर्षी प्रमाणे याही वर्षी जिंतूर शहरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती वर्षी 11 एप्रिल ते 14 एप्रिल दरम्यान भरगच्च असे सांस्कृतिक कार्यक्रम व समाज प्रबोधनाचे ऊत्कृष्ट कार्यक्रमाचे आयोजन करणार असून 14 एप्रिल रोजी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची ढोल ताशाच्या गजरात वाजत गाजत भव्य मिरवणूक काढणार असल्याची माहिती उत्सव समितीचे अध्यक्ष गुणीरत्न वाकोडे यांनी स्पष्ट केले आहे...

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ३१ मार्च २०२६


## मराठावाड्याची देवगिरी लिंगम्पल्ली पर्यंत पळवली :रायलसिमा परभणी पर्यंत कधी ?

**जिंतूर (बी.डी. रामपूरकर)** : तिरुपती ला जाण्यासाठी नांदेड आणि परभणीतून नियमित रोज रेल्वे नाही म्हणून निझामाबाद - तिरुपती रॉयल सीमा एक्सप्रेस ही रेल्वे परभणी पर्यंत वाढवण्याची मागणी बालाजी भक्त करीत आहेत मराठवाड्यातील रेल्वे प्रवास्यांच्या सोई साठी सुरु करण्यात आलेली पूर्वीची नांदेड मुंबई देवगिरी एक्सप्रेस अगोदर नांदेड येथून चं सुटायची परंतु ती काही दिवस सिकंद्राबाद पर्यंत पळवली मग पुढे लिंगम्पल्ली पर्यंत ती रेल्वे आता जात आहे पण हजारो भक्तांना सोई ची ठरू शकणारी निझामाबाद तिरुपती रॉयल सीमा सुपर फास्ट एक्सप्रेस रेल्वे परभणी पर्यंत का येऊ शकत नाही?असा सवाल आता मराठवाड्यातील खासदार महोदयांना बालाजी भक्त विचारत आहेत रॉयलसीमा रेल्वे परभणी पर्यंत वाढवल्यास हजारो बालाजी भक्तांना उत्तम सोय होणार असून दररोज हजारो भक्त तिरुपतीत दर्शनाला जातात व्यापारी दृष्टीने सिकंद्राबाद पर्यंत पण रेल्वे प्रवास्यांची मोठी सोय होणार आहे म्हणून मराठवाड्या तील खासदारांनी आता हा विषय रेल्वे मंत्री यांच्या कडे लावून घरला पाहिजे ही रेल्वे परभणी पर्यंत झाल्यास वेळेची बचत आणि थेट सुविधा होईल असा विस्वास परभणी जिल्हा भाजपा चे व्यापारी आघाडी जिल्हाध्यक्ष प्रदीप कोकडवार यांनी व्यक्त केला आहे






# शिक्षकांच्या समस्या प्राधान्याने सोडवू... उषाताई गायकवाड




**मुरुम (प्रा.सुधीर पंचगल्ले)** : आदरणीय रवींद्र विश्वनाथ गायकवाड यांच्या उमरगा विधानसभा धाराशिव लोकसभा मतदार संघात प्रचाराच्या निमित्ताने मी खंबीरपणे त्यांच्या सोबत होते. जनतेत सहभागी होत होते जनतेच्या प्रेमामुळेच माझ्या स्वप्नात नसतानाही मला धाराशिव जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष होता आले. प्राध्यापक रवी सरांच्या खंबीर मार्गदर्शनाखाली मी जिल्हा परिषदेमध्ये काम करताना शिक्षकांच्या समस्या प्राधान्याने

सोडवेन असे आश्वासन चंद्रकांत गणपतराव पाटील यांच्या सेवानिवृत्ती गौरव सोहळ्यात सन्माननीय उषाताई रवींद्र गायकवाड उपाध्यक्ष तथा सभापती शिक्षण आणि आरोग्य जिल्हा परिषद, धाराशिव यांनी उमरगा तालुक्यातील कलदेव निंबाळा येथील सभागृहात आयोजित केलेल्या कार्यक्रमात दिले. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्यामुळेच माझ्यासहित अनेक महिला वेगवेगळ्या क्षेत्रात दैदिप्यमान कामगिरी करत असल्याचे त्यांनी अभिमानाने सांगितले. उमरगा पंचायत समितीचे गटशिक्षण अधिकारी माननीय राजपूत साहेब प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते तर अध्यक्षस्थानी निवृत्त मुख्याध्यापक गणपतराव पाटील होते. चंद्रकांत पाटील यांनी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा काक्रंबा वाडी तुळजापूर इथून आपल्या सेवेचा प्रारंभ केला तर नंतर जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कलदेव निंबाळा पदवीधर पदोन्नती नंतर सुपतगाव, समुद्राळ येथे कार्य केले.

विषय तज्ञ समावेशित शिक्षण अपंग विभाग यात दोन वर्षे सेवा केली. लमाण तांडा डाळिंब सहशिक्षक, निलेगाव तालुका तुळजापूर तर जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येणेगुर येथे पाच वर्ष मुख्याध्यापक म्हणून सेवा बजावतानाच सेवानिवृत्तीच्या शेवटच्या टप्प्यात विस्तार अधिकारी डाळिंब बीट म्हणूनही त्यांनी कार्य केले. धाराशिव जिल्ह्यामध्ये शिक्षक समितीची स्थापना करत धाराशिव जिल्हा शिक्षक समितीचे संस्थापक अध्यक्ष म्हणूनही शिक्षकांच्या प्रश्नांना वाचा फोडली.शिक्षक आणि विद्यार्थी प्रिय विविध विषयांवरचा अभ्यास असलेले मनमिळावू ,सहनशील, उपक्रमशील शिक्षक चंद्रकांत पाटलांचा सेवापूर्ती गौरव सोहळ्यामध्ये विविध मान्यवरांनी सत्कार केला.

विद्येची देवता क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमापूजनानंतर धाराशिव जिल्हा परिषदेच्या नूतन उपाध्यक्ष सन्माननीय उषाताई रविंद्र गायकवाड यांचा सत्कार पाटील कुटुंबीयांच्या वतीने मुख्याध्यापिका रसिका पाटील मुख्याध्यापिका जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कलदेव निंबाळा यांनी केला. गटशिक्षणाधिकारी माननीय अमोल राजपूत साहेब यांचा सत्कार रमेश पाटील सहाय्यक कृषी अधिकारी उमरगा यांनी केला. पंचायत समितीचे माजी सदस्य बाळासाहेब स्वामी यांचा सत्कार बालाजी बिराजदार जिल्हा उद्योग अधिकारी कोल्हापूर यांनी केला. सेवा निवृत्तीनिमित्त सन्माननीय उषाताई गायकवाड यांनी विस्तार अधिकारी तथा मुख्याध्यापक चंद्रकांत पाटील आणि मुख्याध्यापिका रसिका पाटील यांचा सपत्नीक शाल फेटा आणि हार देऊन सत्कार केला.


नुकतीच कलदेव निंबाळा ग्रामपंचायत उपसरपंचपदी मीरा पाटील यांची बिनविरोध निवड झाल्याबद्दल मीरा पाटील आणि सहाय्यक कृषी अधिकारी रमेश पाटील यांचा सपत्नीक सत्कार धाराशिव जिल्हा परिषदेच्या उपाध्यक्ष सन्माननीय उषाताई गायकवाड यांनी करून पुढील यशस्वी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.माननीय कोकळगावे सर केंद्रप्रमुख, क्षीरसागर सर यांनी केंद्रीय प्राथमिक शाळा डाळिंब केंद्राच्या वतीने चंद्रकांत पाटील आणि रसिका पाटील यांचा सत्कार केला.बलसुर केंद्राच्या वतीने केंद्रप्रमुख माननीय गोपी पवार भुसार सर यांनी शाल फेटा आणि विठ्ठल मूर्ती देऊन सन्मान केला. माननीय तावशीकर मुख्याध्यापक शहीद भगतसिंग हायस्कूल यांच्या वतीने चंद्रकांत पाटलांचा सत्कार करण्यात आला. प्राथमिक शाळा येणेगुरच्या सर्व सहकाऱ्यांकडून चंद्रकांत पाटलांचा सत्कार करण्यात आला. श्रीधर डोंगरे, सरोजा डोंगरे, निवृत्त मुख्याध्यापक गोविंदराव डोणगावे ,कल्लेश्वर गायकवाड ,सुबोध फुलारी, सोलापूर, जि. प. प्रा. शा. महालिंगरायवाडीचे सर्व स्टाफ, जाधव सर भालेराव सर, मुल्ला सर ,यादव मॅडम, भोसले मॅडम, ज्ञान प्रसारक विद्यालय, सुंदरवाडी यांच्यावतीने माननीय अभिमन्यू गायकवाड ,धुळे सर, यांनी सत्कार केला. संतोष कांबळे पंचायत समिती उमरगा, यांनीही चंद्रकांत पाटलांचा सत्कार केला.डॉ. रमाकांत पाटील यांनी पाटील कुटुंबीयांच्या वतीने डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या बहिष्कृत भारत आणि मूकनायक वृत्तपत्राचे संपादकीय पुस्तक भेट देऊन सत्कार केला.चिरंजीव सुजित चंद्रकांत पाटील यांनी चंद्रकांत पाटलांच्या निवृत्ती निमित्त निवृत्तीवर आधारित दोन अतिशय अर्थगर्भ कविता सादर केल्या.कार्यक्रमासाठी राज्य पुरस्कार प्राप्त शिक्षक सुभाष वैरागकर, केसर जवळगा ग्रामपंचायतचे माजी सरपंच विष्णू रामजी पाटील ,कलाकार पाटील, अनिल जामगे, पुणे पोलीस, दिगंबर कल्याणकर, ग्रामसेवक ,सोलापूर, मोहन डोणगावे ,ग्रामसेवक पुणे, मोहन पाटील गजानन डोणगावे, अरुण डोणगावे, शितल पाटील तृप्ती, पाटील,दाळिंब बलसुर केंद्रातील शिक्षक शिक्षिका परिसरातील मान्यवर उपस्थित होते. सूत्रसंचालन आणि आभार डॉक्टर रमाकांत पाटील यांनी मांडले.

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ३१ मार्च २०२६


# महावीर : अहिंसेचे तेजस्वी दीप



**मा**नवजातीच्या इतिहासात काही व्यक्तिमत्त्वे अशी असतात की ज्यांनी आपल्या विचारांनी, तत्त्वज्ञानाने आणि आचरणाने संपूर्ण मानवजातीला एक नवी दिशा दिली. अशा तेजस्वी आणि कालातीत व्यक्तिमत्त्वांमध्ये भगवान महावीर यांचे स्थान अत्यंत उंच आहे. चैत्र महिन्यात साजरी होणारी महावीर जयंती ही केवळ धार्मिक उत्सव नसून ती मानवी मूल्यांचा जागर करणारी, आत्मपरीक्षणाची प्रेरणा देणारी आणि नैतिकतेचा मार्ग दाखवणारी एक महत्त्वपूर्ण पर्वणी आहे. आजच्या वेगवान, स्पर्धात्मक आणि तणावपूर्ण जीवनात महावीरांचे विचार अधिकच सुसंगत आणि आवश्यक वाटतात.भगवान महावीरांचा जन्म इ.स.पूर्व 599 मध्ये वैशालीजवळील कुंडलपूर येथे झाला. बालपणापासूनच महावीरांचा स्वभाव अत्यंत शांत, संयमी आणि करुणामय होता. त्यांना सांसारिक सुखांपेक्षा आत्मिक समाधान अधिक महत्त्वाचे वाटत असे. लहान वयातच त्यांनी समाजातील दुःख, अन्याय आणि विषमता यांचा सखोल विचार केला. त्यांच्या मनात सतत एक प्रश्न घोळत होता की मानवाला खरे सुख कसे मिळेल? या प्रश्नाचे उत्तर शोधण्याच्या प्रयत्नातूनच त्यांच्या जीवनाला एक वेगळी दिशा मिळाली.वयाच्या तिसाव्या वर्षी त्यांनी सर्व सांसारिक बंधनांचा त्याग करून तपश्चर्येचा मार्ग स्वीकारला. हा निर्णय अत्यंत कठीण होता, कारण त्यासाठी त्यांना कुटुंब, संपत्ती आणि सर्व सुखसुविधांचा त्याग करावा लागला. त्यांनी जवळपास बारा वर्षे अत्यंत कठोर साधना केली. या काळात त्यांनी उपास, ध्यान, मौन आणि आत्मसंयम यांचा कठोर अभ्यास केला. अनेक अडचणी, संकटे आणि अपमान सहन करूनही त्यांनी आपला मार्ग सोडला नाही. अखेरीस त्यांनी कैवल्यज्ञान प्राप्त केले आणि 'महावीर' म्हणून ओळखले जाऊ लागले.महावीरांचे तत्त्वज्ञान अत्यंत व्यापक आणि जीवनोपयोगी आहे. त्यांनी पंचमहाव्रतांचा उपदेश केला. अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य आणि अपरिग्रह. या पाच तत्त्वांमध्ये संपूर्ण नैतिक जीवनाचा सार दडलेला आहे. अहिंसा हे त्यांच्या तत्त्वज्ञानाचे केंद्रस्थान आहे. त्यांनी केवळ शारीरिक हिंसा टाळण्याचा उपदेश केला नाही, तर मन, वाणी आणि कृतीतून कोणालाही दुखावू नये, असा व्यापक संदेश दिला. त्यांच्या मते, प्रत्येक जीवामध्ये आत्मा आहे आणि प्रत्येकाला जगण्याचा समान अधिकार आहे. सत्य हा दुसरा महत्त्वाचा सिद्धांत आहे. महावीरांनी सत्याला सर्वोच्च स्थान दिले. त्यांनी सांगितले की सत्य म्हणजे केवळ खोटे न बोलणे नव्हे, तर न्याय, प्रामाणिकपणा आणि नैतिकता यांचे पालन करणे होय. आजच्या समाजात, जिथे असत्य आणि फसवणूक वाढत आहे, तिथे सत्याचे पालन करणे अत्यंत आवश्यक आहे.अस्तेय म्हणजे चोरी न करणे. परंतु त्याचा अर्थ केवळ भौतिक वस्तूंची चोरी टाळणे एवढाच नाही, तर दुसऱ्याच्या हक्कावर अतिक्रमण न करणे, अन्यायाने लाभ मिळवू नये, असा व्यापक अर्थ त्यामध्ये अंतर्भूत आहे. ब्रह्मचर्य आणि अपरिग्रह ही तत्त्वे मानवी जीवनाला संयम आणि संतुलन शिकवतात. ब्रह्मचर्य म्हणजे इंद्रियसंयम, तर अपरिग्रह म्हणजे अनावश्यक वस्तूंचा त्याग. आजच्या उपभोगवादी संस्कृतीत अपरिग्रहाचा संदेश अत्यंत महत्त्वाचा आहे.महावीरांनी 'अनेकांतवाद' हा अत्यंत महत्त्वाचा सिद्धांत मांडला. या तत्त्वानुसार कोणत्याही गोष्टीकडे एकाच दृष्टिकोनातून पाहणे योग्य नाही. प्रत्येक गोष्टीचे अनेक पैलू असतात आणि प्रत्येक व्यक्तीचा दृष्टिकोन वेगळा असू शकतो. त्यामुळे सहिष्णुता आणि संवाद यांना महत्त्व दिले पाहिजे. आजच्या समाजात वाढत्या मतभेदांच्या पार्श्वभूमीवर हा विचार अत्यंत उपयुक्त ठरतो.महावीरांचे तत्त्वज्ञान केवळ धार्मिक नाही, तर सामाजिक सुधारणांसाठीही प्रेरणादायी आहे. त्यांनी जातिभेद, अंधश्रद्धा आणि सामाजिक विषमता यांचा विरोध केला. त्यांनी सर्वांना समानतेचा आणि बंधुत्वाचा संदेश दिला. त्यांच्या मते, प्रत्येक व्यक्ती स्वतःच्या कर्मांद्वारे उन्नती साधू शकते. हा विचार त्या काळात अत्यंत क्रांतिकारक होता. महावीर जयंती हा दिवस या सर्व विचारांचे स्मरण करून देणारा आहे. या दिवशी जैन समाजात विविध धार्मिक कार्यक्रम, पूजा, प्रवचने आणि मिरवणुका आयोजित केल्या जातात. मंदिरांमध्ये विशेष सजावट केली जाते आणि महावीरांच्या मूर्तींची पूजा केली जाते. अनेक ठिकाणी दानधर्म आणि सामाजिक सेवा उपक्रम राबवले जातात. परंतु या उत्सवाचा खरा अर्थ केवळ या विधींमध्ये नसून त्यांच्या तत्त्वांचे आचरण करण्यात आहे.आजच्या आधुनिक युगात, जिथे तंत्रज्ञानाची प्रगती होत आहे, परंतु मानवी मूल्ये कमी होत चालली आहेत, तिथे महावीरांचे विचार अत्यंत महत्त्वाचे ठरतात. त्यांच्या शिकवणुकीमुळे आपण आपल्या जीवनात संतुलन साधू शकतो. अहिंसा, सत्य आणि संयम या मूल्यांचा अवलंब केल्यास समाजात शांतता आणि समन्वय निर्माण होऊ शकतो.महावीरांच्या शिकवणुकीचा प्रभाव केवळ त्यांच्या काळापुरता मर्यादित राहिला नाही, तर पुढील अनेक शतकांपर्यंत समाजाच्या विविध स्तरांवर त्याचा परिणाम दिसून आला. भगवान महावीर यांनी दिलेला अहिंसेचा संदेश पुढे अनेक सामाजिक आणि राजकीय चळवळींचा आधार बनला. अहिंसा ही केवळ वैयक्तिक सद्गुण नसून ती समाजव्यवस्थेचा पाया ठरू शकते, हा विचार त्यांनी प्रत्यक्ष आचरणातून सिद्ध करून दाखवला. त्यांच्या या विचारांचा प्रभाव पुढील अनेक महान व्यक्तिमत्त्वांवरही पडला आणि त्यांनीही अहिंसेचा मार्ग स्वीकारून समाजपरिवर्तनाचे कार्य केले.महावीरांनी मानवी जीवनाला केवळ बाह्य यशाच्या चौकटीत न मोजता, अंतर्मनाच्या शुद्धतेवर भर दिला. त्यांच्या मते, खरे सुख हे बाह्य संपत्ती, सत्ता किंवा प्रतिष्ठेमध्ये नसून आत्मिक समाधानात आहे. त्यामुळे त्यांनी आत्मसंयम, त्याग आणि साधेपणा यांना विशेष महत्त्व दिले. आजच्या काळात, जिथे माणूस अधिकाधिक भौतिक सुखांच्या मागे धावत आहे, तिथे महावीरांचे हे तत्त्वज्ञान आपल्याला थांबून विचार करण्यास भाग पाडते.महावीरांच्या तत्त्वज्ञानातील अपरिग्रह हा विचार आजच्या पर्यावरणीय संकटाच्या पार्श्वभूमीवर अत्यंत महत्त्वाचा ठरतो. अनावश्यक वस्तूंचा संचय, संसाधनांचा अतिरेक वापर आणि उपभोगवादी जीवनशैली यामुळे पर्यावरणावर मोठा ताण येत आहे. जर मानवाने अपरिग्रहाचा मार्ग स्वीकारला, तर नैसर्गिक संसाधनांचे जतन होईल आणि पर्यावरणीय संतुलन राखले जाईल. त्यामुळे महावीरांचे तत्त्वज्ञान केवळ आध्यात्मिक नाही, तर पर्यावरणपूरकही आहे.त्याचप्रमाणे, अनेकांतवाद हा महावीरांनी दिलेला अत्यंत आधुनिक आणि वैज्ञानिक दृष्टिकोन आहे. या तत्त्वानुसार, कोणत्याही विषयाकडे एकाच दृष्टिकोनातून पाहणे चुकीचे आहे. प्रत्येक गोष्टीचे अनेक पैलू असतात आणि प्रत्येक व्यक्तीचा दृष्टिकोन वेगळा असू शकतो. त्यामुळे संवाद, सहिष्णुता आणि परस्पर आदर यांना महत्त्व दिले पाहिजे. आजच्या काळात, जिथे मतभेदांमुळे संघर्ष निर्माण होतात, तिथे अनेकांतवाद हा विचार समाजाला एकत्र ठेवण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरतो.महावीरांनी स्त्री-पुरुष समानतेचाही संदेश दिला. त्यांनी स्त्रियांनाही आध्यात्मिक प्रगतीची संधी दिली. त्या काळात, जेव्हा स्त्रियांना अनेक सामाजिक बंधनांमध्ये अडकवले गेले होते, तेव्हा महावीरांचा हा विचार अत्यंत प्रगत आणि क्रांतिकारक होता. त्यामुळे त्यांचे तत्त्वज्ञान केवळ धार्मिक नाही, तर सामाजिक न्यायाच्या दृष्टीनेही महत्त्वाचे आहे.महावीर जयंती साजरी करताना या सर्व विचारांचे स्मरण करणे अत्यंत आवश्यक आहे. या दिवशी जैन समाजात विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित केले जातात. मंदिरांमध्ये विशेष पूजा, अभिषेक आणि प्रवचने होतात. अनेक ठिकाणी मिरवणुका काढल्या जातात. तसेच, दानधर्म, अन्नदान आणि गरजूंना मदत करण्याचे उपक्रम राबवले जातात. परंतु या उत्सवाचा खरा अर्थ केवळ या बाह्य विधींमध्ये नसून त्यांच्या तत्त्वांचे आचरण करण्यात आहे.आजच्या आधुनिक युगात, जिथे जीवन अधिक वेगवान आणि स्पर्धात्मक झाले आहे, तिथे माणसामध्ये तणाव, असुरक्षितता आणि असंतोष वाढताना दिसतो. अशा परिस्थितीत महावीरांचे तत्त्वज्ञान आपल्याला मानसिक शांती आणि स्थैर्य मिळवण्याचा मार्ग दाखवते. ध्यान, संयम आणि आत्मपरीक्षण यांचा अवलंब केल्यास आपण आपल्या जीवनात संतुलन साधू शकतो.महावीरांचे जीवन आपल्याला हे शिकवते की खरे महानत्व हे बाह्य यशामध्ये नसून आपल्या विचारांमध्ये आणि आचरणामध्ये असते. त्यांनी अत्यंत साधे आणि संयमी जीवन जगले, परंतु त्यांच्या विचारांची उंची अत्यंत महान होती. त्यांच्या जीवनातील प्रत्येक कृती ही मानवतेच्या कल्याणासाठी होती. त्यामुळेच त्यांचे तत्त्वज्ञान आजही तितकेच प्रेरणादायी आणि उपयुक्त आहे.महावीर जयंती हा दिवस आपल्याला आत्मपरीक्षण करण्याची संधी देतो. आपण आपल्या जीवनात कितपत अहिंसा, सत्य, अपरिग्रह आणि संयम या मूल्यांचा अवलंब करतो, याचा विचार करण्याची ही वेळ आहे. जर आपण या तत्त्वांचा अंगीकार केला, तर आपण केवळ स्वतःचे जीवन सुधारू शकतो असे नाही, तर समाजातही सकारात्मक बदल घडवू शकतो.आजच्या काळात, जिथे हिंसा, द्वेष, भ्रष्टाचार आणि असहिष्णुता वाढत आहे, तिथे महावीरांचे विचार आपल्याला योग्य दिशा दाखवतात. त्यांच्या शिकवणुकीमुळे आपण शांततेचा, समतेचा आणि नैतिकतेचा मार्ग स्वीकारू शकतो. जर प्रत्येक व्यक्तीने आपल्या जीवनात थोड्याफार प्रमाणातही या तत्त्वांचा अवलंब केला, तर समाजात मोठा सकारात्मक बदल घडू शकतो.शिक्षणक्षेत्रातही महावीरांचे तत्त्वज्ञान अत्यंत उपयुक्त आहे. विद्यार्थ्यांमध्ये नैतिक मूल्यांची जाणीव निर्माण करण्यासाठी त्यांच्या विचारांचा समावेश शिक्षणात केला पाहिजे. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये केवळ बौद्धिक विकासच नव्हे, तर नैतिक आणि सामाजिक विकासही होईल.महावीरांचे तत्त्वज्ञान हे केवळ एका धर्मापुरते मर्यादित नाही. ते संपूर्ण मानवजातीसाठी मार्गदर्शक आहे. त्यांच्या विचारांमध्ये सार्वत्रिकता आहे. कोणत्याही धर्म, जाती किंवा संस्कृतीतील व्यक्तीने त्यांच्या तत्त्वांचा अवलंब केल्यास त्याचे जीवन अधिक शांत, संतुलित आणि समाधानकारक होऊ शकते.शेवटी असे म्हणता येईल की महावीर जयंती हा केवळ एक धार्मिक उत्सव नसून तो मानवतेचा उत्सव आहे. हा दिवस आपल्याला आत्मपरीक्षण करण्याची, आपल्या जीवनातील त्रुटी सुधारण्याची आणि एक चांगले माणूस बनण्याची प्रेरणा देतो. भगवान महावीर यांचे तत्त्वज्ञान हे आजही तितकेच जिवंत आणि उपयुक्त आहे. त्यांच्या विचारांचा अवलंब करून आपण एक शांत, समतामूलक आणि नैतिक समाज निर्माण करू शकतो. त्यामुळे महावीर जयंती साजरी करताना त्यांच्या शिकवणुकीचा अंगीकार करणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.




**डॉ. राजेंद्र बगाटे**

(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत), ईमेल - bagate.rajendra५@gmail.com